मराठा विद्याप्रसारक समाजाचे

# गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

## संरक्षण व सामिरकशास्त्र विभाग

## भारतीय वायुसेना दिन अहवाल

दिनांक- ०८ ऑक्टो. २०२२

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि संरक्षण व सामिरकशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वायुसेना दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ पी.व्ही रसाळ प्रमुख वक्ते संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा.आर व्ही पवार, आयक्यूएसी समन्वयक प्रा.सी.इ.गुरुळे, प्रा आर एम आंबेकर प्रा ए.ए.पोटे प्रा.दीपक खुर्चे आदी मान्यवर उपस्थित होते याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा आर व्ही पवार यांनी प्रतिपादन केले की 8 ऑक्टोंबर दरवर्षी भारतीय हवाईदल दिवस म्हणून साजरा करतो या दिवशी भारतातील हवाई दल अधिकृतपणे 1932 मध्ये युनायटेड किंगडमच्या रॉयल एअरपोर्टचे सहाय्यक बल म्हणून उदयास आले होते आज या दलाला 90 वर्ष पूर्ण झाली आहे  या दलाचे प्राथमिक ध्येय भारतीय हवाई क्षेत्र सुरक्षित करणे भारतीय हवाई दल केवळ भारतीय प्रदेश आणि राष्ट्रीय हितसंबंधांचे सर्व धोक्यांपासून संरक्षण करते असे नाही तर देशातील नैसर्गिक आपत्तीच्या वेळेसही कार्यरत दिसते म्हणूनच आपल्या जवानांच्या आणि संपूर्ण सैन्यांच्या निस्वार्थ प्रयत्नांचा सन्मान आणि ओळख करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो भारतीय हवाई दल जगात चौथ्या क्रमांकाचे दल आहे फक्त अमेरिका रशिया चीन हे देश भारताच्या पुढे आहेत भारतीय हवाई दलाचे बोधवाक्य नभ-स्पृश्यम दीप्तम आहे त्याचा शाब्दिक अर्थ टच द स्काय विथ ग्लोरी आहे विशेष म्हणजे हवाई दलाचे हे वाक्य भगवद्गीतेच्या अकराव्या अध्यायातून घेतलेले आहे आज भारतीय हवाई दलाचा विस्तार बघितल्यास 45 स्कॉर्डन म्हणजेच सुमारे 500 ते 700 विमान संख्या आहे असे सांगता येते सध्या भारतात दोन ते तीन प्रकारचे लढाऊ विमानांची निर्मिती सुरू झाली आहे भारतीय हवाई दलाने अनेक ऑपरेशन केलेली दिसतात यामध्ये ऑपरेशन विजय, ऑपरेशन मेघदूत यासारखे विविध ऑपरेशनचा एक महत्त्वाचा भाग आहे संयुक्त राष्ट्र सोबत शांतता मिशनमध्येही भारतीय हवाईदल कार्यरत असताना दिसते आज भारतीय हवाई दलात महिला अधिकारीही कार्यरत असताना दिसतात भारताकडे मिग-21 मिराज-2000, जग्वार, सुखोई 30, राफेल लढाऊ विमाने आहे तसेच अप्पाची, चेतक, चित्ता, रुद्रा, चीनुक हेलिकॉप्टरचाही समावेश झालेला दिसतो. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ पी.व्ही रसाळ यांनी प्रतिपादन केले की आज आधुनिक हवाई दलाद्वारे भारताचे हवाई क्षेत्र सुरक्षित आहे भारतीय सशस्त्र  सेनेमध्ये अधिकारी होण्यासाठी

विद्यार्थ्यांनी  एनसीसी, एनडीए, सीडीएस यासारख्या पात्रता परीक्षा देणे आवश्यक आहे. यामधून सशस्त्र सेनेमध्ये अधिकारी होऊन देशसेवा करावी

प्रा सी ई गुरुळे यांनी भारतीय हवाई दिन साजरा करण्याचे महत्त्व सांगितले. याप्रसंगी प्रा एस बी झाडे, श्रीमती झाडे कार्यक्रमासाठी बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा दीपक खुर्चे यांनी केले तर आभार प्रा एस बी झाडे यांनी मानले.